UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष : ९१ • जुन २०२३ • पुरवणी अंक १





प्रकाशक : इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | संपादकीय | |
| २. | "नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : बदलते प्रवाह आणि भविष्यकालीन आव्हानांचा चिकित्सक अभ्यास"<br>- प्रा. डॉ. आर. एस. पवार, शिरपूर, जि. धुळे. | १ |
| ३. | सुंबरान मांडिलंऽऽ सुंबरान मांडिलं.....<br>- प्रविण गुलाबराव काळे, नारायणगाव, पुणे. | ९ |
| ४. | छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचे सागरी शिलेदार<br>- डॉ. मधुकर विठोबा जाधव, हलकर्णी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर | १६ |
| ५. | छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री उद्धाराचे कार्य - एक दृष्टीक्षेप<br>- प्रा. डॉ. उमेश जनबंधू, खापरखेडा, ता. सावनेर, जि.नागपूर. | २२ |
| ६. | देहू (पुणे) रोड, बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापना खरंच पहिले स्थान - एक पुनर्विचार<br>- डॉ. प्रदीप शालिग्राम मेश्राम, नागपूर | २९ |
| ७. | वारकरी संप्रदाय आणि आराध्य दैवत श्री विठ्ठल<br>- प्रा. डॉ. प्रवीण घारपुरे, नरखेड, जि. नागपूर. | ३६ |
| ८. | अनुभवातीत आत्मा : एक विवेचन (एडमंड हुसर्ल यांच्या संदर्भात)<br>- डॉ. रीना नारायणराव बावनकुळे, नागपूर. | ४४ |
| ९. | युक्रेन-रशिया युद्धाचा भारतावरील प्रभाव<br>- प्रा. डॉ. विमल राठोड, नागपूर. | ५० |

| | | |
|---|---|---|
| १०. | **पेशवे रोजनिशीतील खानदेशविषयक नोंदी**<br>- डॉ. दिपक दिनकर किनगे, जळगाव. | ५७ |
| ११. | **समताधिष्ठित आणि जीवनाधिष्ठित शिक्षणपद्धती आणि कर्मवीर भाऊराव पाटील**<br>- डॉ. जी. डी. रुपवते, पेठ, जि. नाशिक. | ७७ |
| १२. | **बुलढाणा जिल्ह्याची ऐतिहासिक वैभवता**<br>- डॉ. नामदेव वा. ढाले, बुलढाणा. | ८३ |
| १३. | **भारतीय लोकशाहीची अमृतमहोत्सवी वाटचाल आणि 'स्वातंत्र्य' मूल्याची प्रस्थापना : एक मागोवा**<br>- डॉ. बाबासाहेब त्रिंबक मोताळे, म्हसदी, ता. साक्री जि. धुळे. | ९३ |
| १४. | **भारतीय चित्रकला में रस के स्वरूप की विवेचना**<br>- डॉ. हरी ओम शंकर, देहरादून. | १०४ |

# पेशवे रोजनिशीतील खानदेशविषयक नोंदी

– डॉ. दिपक दिनकर किनगे,
जळगाव.

खानदेश सुभा हा पेशव्यांच्या राज्यातील एक महत्त्वाचा सुभा होता. इ.स. १७५२ च्या भालकीच्या तहाने हैद्राबादच्या निजामाकडून खानदेश सुभा पेशवा बाळाजी बाजीराव यांच्या कारकिर्दीत मराठा राज्यात समाविष्ट झाला.[१] पेशवेकाळात खानदेश सुभ्यास आशेर, गाळणा, नंदुरबार ऊर्फ नजराबाद, बागलाण, बिज्यागड आणि हंडिया इत्यादी ६ सरकार होते. या ६ सरकारमध्ये एकूण १२० परगणे समाविष्ट होते.[२] पेशवेकालीन खानदेशचा अभ्यास करण्यासाठी संशोधकांना प्राथमिक दर्जाची संशोधन साधने आज रोजी दुर्मिळ आणि मर्यादित स्वरूपात उपलब्ध आहे. त्यापैकी पेशवे रोजनिशी हे एक महत्त्वाचे साधन आहे.

पेशवे रोजनिशी (Selection from Satara Rajas and the Peshwa's Diaries) खंड १ ते ९ यांचे लेखनकार्य राव बहादूर गणेश चिमाजी वाड यांनी केले. डी.बी. पारसनीस, का. बा. मराठे आणि बा.पु. जोशी यांनी डेक्कन व्हर्नाकुलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे (Deccan Vernacular Translation Society, Poona) यांच्या परवानगीने संपादन कार्य पूर्ण केले. तर सोसायटीच्या व मुंबई सरकारच्या परवानगीने पेशवा रोजनिशी खंड १ ते ९ यांचे इ.स. १९०६ ते १९११ दरम्यान प्रकाशित करण्यात आले. या सर्व खंडांच्या छपाईचे कार्य सहस्त्रकार प्रेस सातारा, इंदुप्रकाश प्रेस मुंबई, जगधितेच्छू प्रेस पूना, इंदिरा प्रेस पूना, चित्रशाळा प्रेस पूना इत्यादी छापखान्यांमधून करण्यात आले होते. पेशवा रोजनिशी खंड २ ते ९ मध्ये पेशवे बाळाजी बाजीराव, पेशवे थोरले माधवराव, पेशवे सवाई माधवराव, पेशवे दुसरे बाजीराव यांच्या काळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि प्रशासकीय (मुलकी, न्यायिक, लष्करी प्रशासन) इतिहासाविषयी मौलिक संदर्भ प्राप्त होतात. त्यामध्ये खानदेशच्या संशोधनासाठी अनेक महत्त्वपूर्ण नोंदी आढळल्या आहेत. त्यांची यथायोग्य माहिती देण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे.

पेशवा रोजनिशी ०२, पेशवा बाळाजी बाजीराव – खंड २

| अ. क्र. | पान क्र. | नोंद क्र. | परगणा सरकार/प्रांत | वर्ष | नोंद प्रकार | आशय/मजकूर |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | २६ | ४३ | सुलतानपूर | १७५४–५५ | न्यायिक | माधवराव कदम यांच्या वतन व सरंजामाची कदम परिवारात वाटणी. |
| ०२ | ७१ | १३१ | शेंदुर्णी | १७५०–५१ | प्रशासकीय | गुल महंमद याने ६०० रुपयांची अफरातफरी संदर्भात. |
| ०३ | ८३ | १३८ | जामनेर | १७५४–५५ | प्रशासकीय | धोंडो कृष्ण व विसाजी दादाजी कमवीसदार यांना जकात व मोगलाईची सनद. |
| ०४ | १४७ | २३७ | खानदेश | १७२०–२१ | आर्थिक | खानदेशातून कापड व पासोड्या खरेदी संदर्भात. |

पेशवा रोजनिशी ०३, पेशवा बाळाजी बाजीराव – खंड १

| अ. क्र. | पान क्र. | नोंद क्र. | परगणा सरकार/प्रांत | वर्ष | नोंद प्रकार | आशय/मजकूर |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ३५ | ४८ | सरकार आशेर आणि नाशिराबाद | १७५०–५१ | राजकीय | भूलोजी ढमढेरे यास सनद मोगलांचे परगणे जप्त करून त्यांची व्यवस्था लावणे, सरकार आशेर मधील नशिराबादसह १४ परगण्यांचा समावेश असल्याची माहिती. |
| ०२ | ३९ | ५२ | बऱ्हाणपूर | १७५०–५१ | आर्थिक | बऱ्हाणपूर सुभ्यातून पेशव्यांना तीन लाख रुपयांचे उत्पन्न प्राप्त. |
| ०३ | ४१–४२ | ५७–५८ | प्रांत खानदेश | १७५१–५२ | प्रशासकीय | नंदुरबार परगण्यात भिल्लांचा उपसर्ग होत असल्याची माहिती. |
| ०४ | ४३ | ६० | नंदुरबार | १७५२–५३ | राजकीय | नारो बल्लाळ यास कामाविषयाची सनद. |
| ०५ | १२० | १६८ | बऱ्हाणपूर, प्रांत खानदेश | १७६०–६१ | राजकीय | कृष्णाजी विश्वनाथ यास दिलेल्या सनदेत पार्वतीबाई या बऱ्हाणपूर येथे राहिल्याचा उल्लेख |
| ०६ | १२२ | १६९ | बऱ्हाणपूर, प्रांत खानदेश | १७६०–६१ | राजकीय | पार्वतीबाई यांची सेवा केल्याबद्दल झांबरोजी बाघ यास एक चावर जमीन इनाम दिल्याचा उल्लेख. |
| ०७ | १३६ | १९४ | एदलाबाद | १७४०–४१ | राजकीय | पेशवा–निजाम भेटीची माहिती. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०८ | १६१ | २४७ | प्रांत खानदेश | १७४०-४१ | राजकीय | भिल्लपट्टी संदर्भात देशमुख, देशपांडे यांना पत्रे. |
| ०९ | १६२ | २५० | नशिराबाद, प्रांत खानदेश | १७५४-५५ | राजकीय | जमीनदार कोळी व भिल्ल हे मिळून गावकरी आणि सरकार यांचे नुकसान करतात म्हणून जमीनदार व कोळ्यांची वतने जप्त करून माधवराव विश्वनाथ यास कमावेशी दिली याची माहिती. |
| १० | १७६ | २६९ | प्रांत खानदेश | १७५०-५१ | लष्करी | महंमद हशम यास ५० खानदेशी माणसे आणावयास पाठविले. |
| ११ | १८२ | २८२ | सुलतानपूर | १७५६-५७ | लष्करी | खंडेराव बांडे याच्या सरंजाम संबंधी माहिती. |
| १२ | १८८ | २९६ | आशेर सरकार | १७४४-४५ | लष्करी | दत्ताजी मोरेश्वर यास आशेर किल्ल्याचा दरवाजा नीट करण्याविषयी पत्र. |
| १३ | २०६ | ३३१ | पाचोरे | १७४३-४४ | प्रशासकीय | शेर सुलतान या सातगावच्या पाटलास पाटीलकी संदर्भात पत्र पाठवून तनख्यानुसार वसूल करण्याचे आदेश. |
| १४ | ३४५-५१ | ४९५ | नशिराबाद प्रांत खानदेश | १७६०-६१ | आर्थिक-कर्जपट्टी | प्रांत खानदेशमधील महालांच्या अंमलदारांना सनद एक वर्षाचा कर्जपट्टीचा ऐवज वसूल घेऊन सरकारचे हिशोबी जमा करणे असा आदेश. |
| १५ | ३५२ | ४९७ | प्रांत खानदेश | १७५०-५१ | आर्थिक | त्रिंबकराव विश्वनाथ बाबती अधिकारी यास दरवर्षी घासदाणा ७५० रुपये घ्यावा, अशी सनद. |
| १६ | ३५४ | ५०० | सुलतानपूर | १७५२-५३ | आर्थिक | सुलतानपूरमधील देशमुख-देशपांडे यांना घासदाणा रक्कम १३ हजार रुपये इतकी केल्याचे कळविले.[४] |

पेशवा रोजनिशी ०४, पेशवा सवाई माधवराव – खंड ०३

| अ. क्र. | पान क्र. | नोंद क्र. | परगणा सरकार/प्रांत | वर्ष | नोंद प्रकार | आशय/मजकूर |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ४ | ०३ | नशिराबाद प्रांत खानदेश | १७७४–७५ | राजकीय | फितुरीने दुसरीकडे गेलेल्या शिलेदारांची चौकशी करून घरे–वतने जप्त करणे. शिलेदारांवर पाटील–कुलकर्णी यांना जामीन घेऊन नियंत्रण ठेवणे अशा सनदा खानदेश प्रांतातील कमाविसदारांना पाठविण्यात आल्याची माहिती. |
| ०२ | ५१ | ६३ | किल्ले आशेर | १७७३–७४ | राजकीय | किल्ले आशेरवर हुजूरातून लोक पाठविले जातील अशी जगन्नाथ नारायण यांचे नावे सनद. |
| ०३ | ७४ | ८४ | पेशवा राज्य | १७९०–९१ | राजकीय | गंगाबाईला पुत्र झाला म्हणून सर्व किल्ल्यावरील थोडक्यात अन्यायाचे गुन्हेगारांना सोडून द्यावे, असे आदेश देण्यात आले. |
| ०४ | २०९ | २४८ | चाळीसगाव–धुळे | १७७८–७९ | राजकीय | विठ्ठलराव पवार व मल्हारराव पवार यांच्यात सरंजामाची वाटणी. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०५ | २२० | २५३ | सुलतानपूर, थाळनेर, उत्राण, रावेर | १७७५-७६ | राजकीय | तुकोजी होळकर जमीनदाराचा हक्क-रुसून आणि इनाम सरकारात भरावयास तयार असल्याची माहिती नारो कृष्ण सरसुभा खानदेश यास सनदेत देण्यात आली होती |
| ०६ | २२१ | २५ | रावेर | १७७५-७६ | राजकीय | नारो शिवदेव कमाविसदार परगणे रावेर यास सनद की, येथील निम्मे अंमल तुकोजी होळकर यास देणे. |
| ०७ | २२२ | २५७ | रावेर | १७७६-७७ | राजकीय | तुकोजी होळकरास परगणे रावेर कडून ०५ लाख रुपयांचा सरंजाम देण्यात आला. |
| ०८ | २२७ | २६३? २६४ | आशेर सरकार | १७७८-७९ | राजकीय | महादजी शिंदे यांच्या कुटुंबासाठी आणि लष्करी सरंजाम म्हणून किल्ले आशेर देण्याची सनद. |
| ०९ | २३८ | २७१ | आशेर सरकार | १७८१-८२ | राजकीय | केशवराव जगन्नाथ यास आशेर किल्ला महादजी शिंदे यांना देण्याची सनद. |
| १० | २५७ | २९९ | चोपडे, जलोद | १७७७-७८ | राजकीय | बाळाजी जनार्दन यास चोपडे, जलोद मधील काही महल व गावे लष्करी सरंजाम म्हणून देण्याची सनद. |
| ११ | २९५ | ३५० | नशिराबाद | १७८५-८६ | राजकीय | नारो कृष्ण यास परगणे पाचोरे व वरणगावच्या मोबदल्यात परगणे नशिराबाद देण्यात आल्याची नोंद |

पेशवा रोजनिशी ०५, पेशवा बाजीराव दुसरा

| अ. क्र. | पान क्र. | नोंद क्र. | परगणा सरकार/प्रांत | वर्ष | नोंद प्रकार | आशय/मजकूर |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ७१ | ४५ | रावेर | १८००-०१ | राजकीय | परगणे रावेरचा अंमल काशीराव होळकरकडून अमृतराव याजकडे दिला. |
| ०२ | ८४-८५ | ६५ | पाचोरे व वरणगाव | १७९७-९८ | राजकीय | दौलतराव शिंदे यास परगणे पाचोरे, वरणगाव आणि इतर प्रांत व परगणे या प्रदेशांचा लष्करी सरंजाम देण्यात आला. |
| ०३ | १०१ | ८७ | चोपडे, जलोद, भामेर, डांगरी | १७९८-९९ | राजकीय | बाळाजी जनार्दन यास त्याचे लष्करी सरंजाम परत देण्यात आले म्हणून त्याच्याकडील कमाविसदारांनी रुजू होऊन महसूल अंमल सुरळीत द्यावा असे खानदेश सुरसुभा व्यंकटराव नारायण यास पत्र. |
| ०४ | १७५ | १७२ | खानदेश | १७९८-९९ | राजकीय | पठाण व पेंढारी यांच्या बंडाचा बंदोबस्त करण्यासाठीचे खानदेश सुरसुभा व्यंकटराव नारायण यास पत्र. |
| ०५ | १९६-९७ | १९१ | एरंडोल | १७९७-९८ | प्रशासकीय | घन:श्याम त्रिंबक कमाविसदारास सनद की, जमाबंदीचा ठराव हा खानदेशाच्या सरसुभ्यादाराशी चर्चा करून करावा. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०६ | २३५-३६ | २२६ | पेशवा राज्य | १८०४-०५ | धार्मिक | गोदावरी नदीत प्रतीवर्षी महोत्सवानिमित्त पेशवा राज्यातील सर्व प्रांत-महालातून देणगी देण्याविषयी पत्र. त्यानुसार एक पायली धान्य आणि एक आणा मनोहर देव यास दक्षिणा म्हणून देत जाणे. |
| ०७ | २६०- | २४२ | पेशवा राज्य | १७९९-१८०० | धार्मिक | पंचम लिंगायत व चरंती जंगम यांच्यातील रोटी व्यवहार व आचरण याविषयीच्या वादाचे निराकरणासंदर्भात पत्र.[६] |

पेशवा रोजनिशी ०६, पेशवा सवाई माधवराव – खंड २

| अ. क्र. | पान क्र. | नोंद क्र. | परगणा सरकार/प्रांत | वर्ष | नोंद प्रकार | आशय/मजकूर |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | १५३-५४ | ६४५ | चाळीसगाव, मेहुणबारे, भडगाव | १७७६-७७ | राजकीय | चाळीसगाव, मेहुणबारे आणि भडगाव परगण्यातील भिल्लांचा उपद्रव थांबवण्यासाठी कमाविसदारास पत्र. |
| ०२ | १५४-५५ | ६४६ | जळगाव, एदलाबाद | – | राजकीय | जळगाव व एदलबाद परगण्यातील भिल्लांचा उपद्रव थांबविण्यासाठी कमाविसदारास पत्र. |
| ०३ | १५५-५६ | ६४७ | नंदुरबार, खानदेश | १७७८-७९ | राजकीय | भिल्लांचा बंदोबस्त करण्यासाठी तुकोजी होळकर यांचे नावे सनद. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०४ | १६०-६६ | ६५३ | खानदेश | १७८३-८४ | राजकीय | भिल्लांचा बंदोबस्त करण्यासाठी तुकोजी होळकर यांचे नावे सनद. |
| ०५ | १६७ | ६५४ | खानदेश | १७८४-८५ | राजकीय | नारोशंकर यास भिल्लपट्टी आकारण्याविषयी पत्र. |
| ०६ | १६७ | ६५५ | भडगाव, खानदेश | १७८५-८६ | राजकीय | भिल्लपट्टी संदर्भातील पत्र. |
| ०७ | १६८ | ६५६ | खानदेश | १७८९-९० | राजकीय | भिल्लांच्या कव्हेरा किल्ल्यावरील हल्ल्याची माहिती देणारे पत्र. |
| ०८ | १७२ | ६५८ | खानदेश | १७९३-९४ | राजकीय | नारो कृष्ण याने पुणे दरबारी विनंती केली की, बंदोबस्त करण्यासाठी भिल्लपट्टीचा लागू करावी. |
| ०९ | १७४ | ६६० | नंदुरबार | १७७७-७८ | राजकीय | नंदुरबार परगण्याच्या कमाविसदारास सनद की, दोंडाईचेकर राऊळाचा परगण्यातील उपद्रव कमी करावा. |
| १० | २२२ | ७१५ | वरणगाव | १७७६-७७ | आर्थिक | तहाप्रमाणे वरणगाव परगण्यातील स्वराज्याचा अंमल घेणे म्हणून जहागीरास पत्र. |
| ११ | २३८ | ७३१ | नंदुरबार | १७८४-८५ | आर्थिक | कुकुरवाडे गावाने सारा वसुली देण्याचे नाकारले तो वसूल करण्याबाबत पत्र. |
| १२ | २६० | ७५५ | बोदवड | १७७३-७४ | प्रशासकीय | विश्वासराव रामचंद्र यास पारगणे बोदवडची मामलत ०४ वर्षांसाठी देण्यात आली. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | २८० | ७७१ | एरंडोल | १७९१–९२ | आर्थिक | एरंडोलमधील दरकदारांनी बाकी दिला नसल्याने वेतन थांबविले होते. हिशेब मिळाल्यामुळे वेतन सुरू करण्याविषयी कमावीसदारास आज्ञा. |
| १४ | ३०५–०६ | ७९६ | खानदेश | १७७५–७६ | आर्थिक | खानदेशातील महालनिहाय रयतेपासून पाटील, कुलकर्णी, शेटे–महाजन व चौगुले यांचे हक्क मुशाहिरा व इनाम जमिनीचा एक वर्षाचा ऐवज सरकारात जमा करणे विषयी माहिती |
| १५ | ३०९–१० | ७९९ | वरणगाव | १७७६–७७ | आर्थिक | दहकपट्टी संदर्भातील पत्र– स्वराज्याचा हक्क म्हणून सरकारात दहक ऐवज घेणे, जहागिरीची दहकपट्टी नबाबकडील कमाविसदार घेतील, जाजती गैरवाजवी उपद्रव न करणे नारो कृष्ण सरसुभा यास सनद. |
| १६ | ३१३–१४ | ८०५ | वरणगाव | १७८१–८२ | आर्थिक | देशमुख देशपांडे यांनी महाली शिबंदीपट्टी सरकारात देण्यासाठी आज्ञापत्र.[७] |

पेशवा रोजनिशी ०७, थोरले माधवराव पेशवे – खंड २

| अ. क्र. | पान क्र. | नोंद क्र. | परगणा सरकार/प्रांत | वर्ष | नोंद प्रकार | आशय/मजकूर |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | १०९ | ५०६ | चाळीसगाव | १७६६–६७ | प्रशासकीय (वतन) | मीठे खान काजीच्या पत्नीस काजी वतनासंबंधी आणि इनाम याची माहिती देणारे पत्र. |
| ०२ | १९४ | ५८८ | एरंडोल | १७६४–६५ | न्यायिक | साखरीकरांनी कटारीकर पाटलांचा खून केला, त्यासंदर्भात नारोकृष्ण दरवे यांचे नावे चिटणीसी. |
| ०३ | १९६ | ५९० | एदलाबाद | १७६५–६६ | | चाकणच्या देशपांडेने चांगदेवच्या ब्राह्मण बाईशी बदकर्म केल्याने त्याच्या वतन जप्तीचा आदेश. |
| ०४ | १९७ | ५९१ | एदलाबाद | १७६५–६६ | | चाकणच्या देशपांडेने चांगदेवच्या ब्राह्मण बाईशी बदकर्म केल्याने त्याच्या वतन जप्तीचा आदेश न्यायमूर्ती रामशास्त्रींच्या निवाड्याने देण्यात आला. |
| ०५ | २२७ | ६२५ | किल्ले आशेर | १७७०–७१ | | आशेर किल्ल्यातील बंदीवानांविषयी चिटणीसांना पत्र. |
| ०६ | ६६९ | ६८३ | एदलाबाद | १७६३–६४ | धार्मिक (इनाम) | चांगदेवच्या वामनाचार्यांना सूर्यग्रहणानिमित्त एक चाहूर जमीन इनाम देण्यात आल्याची माहिती. |
| ०७ | २७५ | ६९७ | खानदेश, जलोद, डांगरी | १७६३–६४ | प्रशासकीय (सन्मान) | बाबुराव राम आणि बाळाजी जनार्दन फडणीस यांना पालखीचा सरंजाम देण्याविषयी पत्र. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०८ | ३१८ | ७४३ | – | १७६२–६३ | सामाजिक | १९७ स्त्री गुलामांची यादी, त्यास भागी खानदेशी, स्वरूपी खानदेशी आणि रूपी खानदेशी अशी नावे आहेत. |
| ०९ | ३३२ | ७६१ | जामनेर, मेहुणबारे, भडगाव | १७६७–६८ | सामाजिक–धार्मिक | जोगी, भराडी व गोंधळी यांच्याकडून नजर वसूल करण्याविषयी चिटणीसास पत्र. |
| १० | ३४१ | ७६५ | नशिराबाद, | १७६९–७० | सामाजिक–धार्मिक | खानदेशातील ब्राह्मणांनी आनंदराम जोशी हे अभीर आहेत म्हणून त्यांच्याशी पंक्तीभेद व शरीरसंबंधात मनाई केली, त्याविषयीचा न्याय–निवाडा करून खानदेशात अभीर नाही, असा निर्णय असल्याचा उल्लेख. |
| ११ | ३८५ | -- | जामनेर | १७६१–६२ | प्रशासकीय | रमजान ०२ रोजी जामनेर येथे थोरले माधवराव पेशवे यांचा मुक्काम. |
| १२ | ४०७ | -- | एदलाबाद | १७६५–६६ | प्रशासकीय | रजब ०३ ०५ रोजी एदलाबाद येथे थोरले माधवराव पेशवे यांचा मुक्काम.[८] |

पेशवा रोजनिशी ०८, पेशवा सवाई माधवराव – खंड ३

| अ. क्र. | पान क्र. | नोंद क्र. | परगणा सरकार/प्रांत | वर्ष | नोंद प्रकार | आशय/मजकूर |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०७–०८ | ८२७ | खानदेश | १७७५–७६ | महसूल आर्थिक | परगणे रायपूरची जमाबंदीची चौकशी करून परगण्याची व्यवस्था लावणे याविषयी नारो कृष्ण यास पत्र. |
| ०२ | ११–१२ | ८३२ | खानदेश | १७७६–७७ | महसूल आर्थिक | जमाबंदी आकारणी करण्याविषयी सर्व कमाविसदारांना सनदा. |
| ०३ | १३–१४ | ८३७ | तरफ आशेर | १७७७–७८ | महसूल आर्थिक | फडणवीस जगन्नाथ महादेवाच्या तक्रारीनुसार त्याला भोजन खर्च देण्याविषयी केशव जगन्नाथ यास सनद. |
| ०४ | ६८ | ८६५ | शेंदुर्णी, तोंडापूर, जामनेर | १७९२–९३ | प्रशासकीय न्यायिक | देशमुख–देशपांडे वतन विषयक वादाचा निवाडा. |
| ०५ | १५७ | ९९७ | नशिराबाद | १७७४–७५ | प्रशासकीय | हिराजी रणसोड दिमत महादजी केशव कमाविसदार चिटणीसी व ताकीद की, निबाजी व तानाजी महाजनास न्याय द्यावा. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०६ | १६७ | १००६ | एरंडोल पाचोरे वरणगाव | १७८४-८५ | प्रशासकीय | ०५ वर्षाच्या तगाईच्या रकमेत तफावत आल्याने पेशव्यांनी महादजी रामचंद्र आणि नारो बाजीराव यांना चौकशीसाठी पाठवले. |
| ०७ | २०६-०७ | १०४३ | एरंडोल, रावेर, एदलाबाद व बेटावद | १७९२-९३ | इनाम नेमणूक | कमावीसदार भिकाजी विश्वनाथ यास इनाम व बेवारस जमिनी सरकारात घ्यावयाची आज्ञा. |
| ०८ | २२७-२८ | १०७२-७३ | गंगाथडी, खानदेश | १७७७-७८ | वजन-मापे | मकरंद सिंग लछीराम याची बागलाण, खानदेश व गंगाथडी प्रांतात वजन-मापे शिक्के आणि वट छपाईचे कामकाजासाठी नियुक्ती. |
| ०९ | २२८ | १०७४ | गंगाथडी, नशिराबाद खानदेश | १७७७-७८ | वजन-मापे | मकरंदसिंग लछीराम याचेकडून वजन-मापांवर शिक्के करून घेण्याची कमाविसदारांना आज्ञा. |
| १० | २४४ | १०८६ | नंदुरबार | १७८४-८५ | मजुरी | नंदुरबारच्या रुपी कलावंतीणीस पुणे येथे लष्करात रवाना करणे म्हणून घाशीराम सावळदास कमावसदारांला सनद. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ११ | २६५ | ११२३ | खानदेश | १७७९–८० | धार्मिक सामाजिक | कुंभाराची वधू–वरे घोड्यावर बसून जाऊ नयेत म्हणून कासार, सुतार आणि लोहार यांनी दिकत केली. पण कुंभारांना न्याय मिळाला, सरसुभानारो कृष्ण यास पत्र कि, बानाजी कासार व कृष्णाजी लोहार यांच्याकडून गुन्हेगारी वसूल करावी. |
| १२ | २७०–७६ | ११२८ | पेशवा राज्य | १७८२–८३ | धार्मिक, सामाजिक | महानुभाव वेगळा पंथ नसून एक कनिष्ठ जात आहे, असा खटला पेशव्यांकडे सादर त्याची पैठण येथे सुनावणी घेण्यात आली. |
| १३ | २८७ | ११४४ | पेशवा राज्य | १७८९–९० | धार्मिक, सामाजिक | प्रभू लोकांचे धर्माचाराविषयी पेशवे नारायणराव कारकीर्दीतील आदेश.[१] |

पेशवा रोजनिशी ०९, थोरले माधवराव पेशवे – खंड ०१

| अ. क्र. | पान क्र. | नोंद क्र. | परगणा सरकार/प्रांत | वर्ष | नोंद प्रकार | आशय/मजकूर |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०६ | ०८ | खानदेश | १७६२–६३ | राजकीय प्रशासकीय | नारो कृष्ण याच्या नावे सनद की, पिसोळचा किल्ला ताब्यात घेऊन किल्लेदारास तीन हजार रुपयाची जहागीर द्यावी. |
| ०२ | १८ | २३ | चाळीसगाव | १७६३–६४ | राजकीय | चाळीसगाव परगण्याची जहागीर निजाम अली खानास मुघलांनी आणि पेशव्यांनी दिल्याची माहिती. |
| ०३ | १३१ | १४८ | जळगाव, खानदेश | १७६३–६४ | राजकीय | जानोजी भोसले यास ३३ परगण्यांचा लष्करी सरंजाम, त्यात जळगाव परगण्यांचा समावेश होतो. |
| ०४ | १३५ | १५१ | बोदवड, जळगाव, खानदेश | १७६८–६९ | राजकीय | खानदेशावर आक्रमण करणाऱ्या भोसल्यांच्या सेनेचा पराभव केला, म्हणून चिंतामण हरी यास सनद देऊन सन्मान करण्यात आला. |
| ०५ | १४२ | १५६ | नंदुरबार | १७६२–६३ | राजकीय | मल्हारराव होळकर यास नंदुरबारचा प्रदेश लष्करी सरंजाम देण्यात आल्याची माहिती. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०६ | १४४ | १५७ | रावेर, खानदेश | १७६२-६३ | राजकीय | मल्हारराव होळकर यास परगणे रावेर आणि गाळणा हा प्रदेश लष्करी सरंजाम देण्यास आल्याची माहिती. |
| ०७ | १५० | १६५ | एदलाबाद | १७६५-६६ | राजकीय | शिंदेकडील महालाची जप्ती करण्यासाठी अंताजी महादेवा सनद. |
| ०८ | १६० | १७३ | एदलाबाद | १७६६-६७ | राजकीय | सखुबाई शिंदे यांना संसाराचे बेगमीस नेमणूक म्हणून परगणे एदलाबादमधील ६५ हजार रुपये वसुलीचा अधिकाराची सनद. |
| ०९ | १७४ | १८७ | धरणगाव, शिंदखेडा | १७६९-७० | राजकीय | महादजी शिंदे यांना परगणे शिंदखेडा मोबदल्यात धरणगाव व बडवे परगणा देण्यात आल्याची माहिती. |
| १० | १७५ | १८८ | सोनगीर | १७६२-६३ | राजकीय | नारो शंकर यास सनद की, किल्ले सोनगीर विठ्ठलराव शिवदेव याचे ताब्यात देणे. |
| ११ | १७६ | १८९ | सावदा, जामनेर, धुळे,बेटावद, सोनगीर | १७६२,६३ | राजकीय | विठ्ठलराव शिवदेव उमेद तुलमुलुख बहाद्दर यास फौजेसाठी सरंजाम. |
| १२ | १७७ | १९० | सावदा, जामनेर धुळे, बेटावद, | १७६२-६३ | राजकीय | विठ्ठलराव शिवदेव उमेद तुलमुलुख बहाद्दर यास फौजेच्या आकारासह खर्च. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | २९३ | ३१५ | सुलतानपूर | १७६४–६५ | राजकीय (बंड) | तोतया प्रकरण, नारो शंकर यास जयनगर येथे मदत. |
| | २९३ | ३१६ | सुलतानपूर | १७६४–६५ | राजकीय (बंड) | गोसाव्यांच्या सुलतानपूरच्या उपद्रवासंदर्भात माहिती. |
| १४ | २९४ | ३१७ | सुलतानपूर, नंदुरबार | १७६४–६५ | राजकीय–प्रशासकीय | नारो शंकर यास चक्रोजी कदम बांडे याचा मोकासा जप्तीचा आदेश. |
| १५ | ३०२ | ३३० | खानदेश | १७६६–६७ | राजकीय (बंड) | चिंतामणी हरी यास भिल्लांचा दंगा मोडून काढण्याचा आदेश. |
| १६ | ३०५ | ३३६ | -- | १७६६–६७ | प्रशासकीय | नारो कृष्ण याची घरे जप्ती करणेविषयी गंगाधर दाजी चिटणीसी पत्र. |
| १७ | ३०७ | ३३८ | शेंदुर्णी | १७६२–६३ | लष्करी | त्रिंबकराव शिवदेव यास सरंजाम म्हणून ३००० स्वारांसाठीच्या खर्चाची सनद. |
| १८ | ३१८ | ३४५ | भालकी | १७६३–६४ | लष्करी | रामचंद्र जाधवराव सेनापती यास लष्करी सरंजाम आठ परगणे देण्यात आले. |
| १९ | ३१९ | ३४६ | डांगरी | १७६३–६४ | लष्करी | मिरखान टोके याच्या लष्करी सरंजामाची माहिती[10] |

वरील नोंदीमध्ये राजकीय महत्त्वाच्या बाबी, लष्करी खात्यातील फौज, सरंजाम, किल्ले यांची माहिती, मुलकी खात्यातील साऱ्याचा वसूल, सूट व हप्तेबंदी, तगाई, पडीत जमिनीच्या लागवडीकरिता व बागाईत वाढविण्याकरिता विशेष प्रकारची सवलत, कमावीसदार, जमीन महसुलाचे हिशोबाची तपासणी, गावांच्या हद्दीचे तंटे, अबकारी, कर्जपट्टी, घासदाणा आणि किरकोळ कर यांची माहिती, गावचे व महालाचे वतनदार, मुलकी नोकर, न्याय खात्यातील दिवाणी व फंदफितुरी व राजद्रोह, चोऱ्या व दरोडे, फसवणूक, बदकर्मे यासारखे फौजदारी गुन्हे, सरकारी कामगार व जहागिरदार यांचे गैरवर्तन, इनाम, नक्त नेमणुकी, वतने, देणग्या, वर्षासने, धर्मकृत्ये, बहुमान, सार्वजनिक इमारती, वजने व मापे, धर्मसंबंधी व सामाजिक, सार्वजनिक उत्सव, पेशव्यांचे मुक्काम अशा विविध बाबींची तपशीलवार माहिती पेशवे रोजनिशीमध्ये गाव किंवा परगणावर आणि वर्षनिहाय नोंदवलेली आहे. त्यामध्ये खानदेशच्या संशोधनासाठी अनेक महत्त्वपूर्ण नोंदी आढळल्या आहेत. त्यांची यथायोग्य माहिती देण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे.

वरील नोंदीवरून मध्ययुगीन खानदेशातील अनेक गावांविषयी पेशवे रोजनिशीत महत्त्वपूर्ण माहिती उपलब्ध आहे याची माहिती मिळते. ती माहिती खानदेशच्या प्रादेशिक व स्थानिक इतिहासलेखन करण्यासाठी महत्त्वाची राहील. गावाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि मुलकी, न्यायिक, लष्करी प्रशासन याविषयीच्या माहितीमुळे त्या संबंधित गावाच्या इतिहासलेखनात मोलाची भर पडेल आणि त्याचबरोबर खानदेशच्या प्रादेशिक इतिहास लेखनासाठीही त्याचा मोठा लाभ होईल. वर्तमान काळात प्रादेशिक व स्थानिक इतिहासलेखन करणारे संशोधक पुढे येत आहेत. खानदेशविषयी संशोधन करणाऱ्या संशोधकांसाठी पेशवे रोजनिशीतील वरील सर्व महत्त्वपूर्ण नोंदी उपयुक्त ठरतील.

**संदर्भ सूची :**

१) महाजन टी.टी., ***खानदेशचा राजकीय व सांस्कृतिक इतिहास,*** कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९९८, पृ. २९१.

२) शहा जी. बी., ***मध्ययुगीन खानदेश,*** प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती, जानेवारी २०१५, पृ. २४ ते २७.

३) वाड ग. चि., पारसनीस डी.बी. (संपा.), ***पेशवा रोजनिशी,*** खंड २, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, १९०६.

४) वाड ग. चि., पारसनीस डी.बी. (संपा), ***पेशवा रोजनिशी, खंड ३,*** डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, १९०८.

५) वाड ग. चि., मराठे का. बा. (संपा), ***पेशवा रोजनिशी, खंड ४,*** डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, १९०८.

६) वाड ग. चि., जोशी बा.पू. (संपा), ***पेशवा रोजनिशी, खंड ५,*** डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, १९०८.

७) वाड ग. चि., मराठे का. बा. (संपा), ***पेशवा रोजनिशी, खंड ६,*** डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, १९०९.

८) वाड ग. चि., जोशी बा.पू. (संपा), ***पेशवा रोजनिशी, खंड ७,*** डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, १९११.

९) वाड ग. चि., मराठे का. बा. (संपा), ***पेशवा रोजनिशी, खंड ८,*** डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, १९११.

१०) वाड ग. चि., साठे का. ना. (संपा), ***पेशवा रोजनिशी, खंड ९,*** डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, १९११.